**मार्गदर्शक सुचना**
**कृषि जागृती सप्ताह - दि.१ जुलै ते ७ जुलै २०१६**

जा.क्र./कृमावि(विप्र-४)/कृ.स./३७२/२०१६
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
दि. २१ /०६/२०१६

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक, --------विभाग------**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जि. ----------------**

## विषय - कृषि जागृती सप्ताह साजरा करणेबाबत मार्गदर्शक सुचना...

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषि क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी लक्षात घेउन त्यांची जयंती दि १ जुलै रोजी राज्यात 'कृषि दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने सन २०१६ मध्ये दि. १ ते ७ जुलै २०१६ या कालावधीत कृषि विभागामार्फत संपुर्ण राज्यात "कृषि जागृती सप्ताह" साजरा करणेस शा.नि.क्र.कृषिदि-२०१६/प्र.क्र.३६(२)/३अे मुंबई दि. १७/०६/२०१६ अन्वये शासनाने मान्यता दिली आहे. कृषि विद्यापीठे, केंद्रीय संशोधन संस्था यांनी संशोधीत केलेले अद्ययावत कृषि तंत्रज्ञान व कृषि विषयक इतर अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवून त्याचा अवलंब शेतक-यांनी प्रभावीपणे करावयासाठी सप्ताहात मोहिम स्वरुपात आयोजन करण्यात येणार आहे.

**उद्देश :-**

- शासनाच्या विविध केंद्र व राज्य पुरस्कृत कृषि विषयक योजना शेतक-यांपर्यंत पोहचविणे.
- राबविलेल्या योजनांची फलश्रुती, यशस्वीता याबाबत व्यापक प्रसिध्दी करणे.
- 'पीक उत्पादनात स्थैर्य राखत उत्पादन खर्च कमी करणे' आणि 'प्रति थेंब अधिक उत्पादन' या संकल्पनांबाबत जनजागृती व मार्गदर्शन करणे.
- कडधान्य उत्पादन वाढीसाठी जनजागृती व मार्गदर्शन करणे.
- कापसावरील शेंदरी बोंड अळी आणि सोयाबीनवरील मोझॅक व पिवळा मोझॅक यांच्या एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन जनजागृती व मार्गदर्शन करणे.
- एकात्मिक शेती पद्धतीबाबत जनजागृती करणे.
- नाविन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवणे.

**कार्यपद्धती** :-

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधित उपविभागिय कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांच्या मार्फत तालुकास्तरावरील सप्ताहाचे संपूर्ण नियोजन आराखडे **परिशिष्ट -१** प्रमाणे तयार करुन घ्यावेत. सदरचा आराखडा तयार करण्याकरीता सर्वसाधारण सुचना खालीलप्रमाणे –

✓ तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व गावांमध्ये बैठक/सभा/मेळावा यांच्या तारीखनिहाय वेळा निश्चित करुन सप्ताहाचे सुक्ष्म नियोजन करावे. गाव पातळीवर बैठक आयोजनापूर्वी पूर्वकल्पना देणेत यावी.

- ✓ सदर सप्ताहाचे नियोजन करताना कृषि विद्यापीठे आणि त्याअंतर्गत येणारी संशोधन केंद्रे, राष्ट्रीय कृषि संशोधन केंद्र (एनआरसी) कृषि विज्ञान केंद्र, कृषि महाविद्यालये, कृषि तंत्र निकेतन, अशासकिय संस्था, कृषि विज्ञान मंडळ, शेतकरी उत्पादक कंपन्या, पिकनिहाय उत्पादक संघ, साखर कारखाने, राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँका, आत्मा संबंधित सर्व सल्ला समित्या, कृषि उत्पन्न बाजार समित्या, महाबीज, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, वखार महामंडळ तसेच महसूल, सहकार, आदिवासी विकास विभाग आणि सर्व कृषि संलग्न विभाग यांचा सक्रीय सहभाग घ्यावा.
- ✓ मनुष्यबळाचा प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन कृषि विभाग व जिल्हा परिषदेचा कृषि विभाग यांच्या बरोबरीनेच पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्य व्यवसाय, रेशीम उद्योग, मधुमक्षिकापालन, आत्मा, महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प ,वसुंधरा पाणलोट प्रकल्प या सर्वांशी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांचाही सहभाग घ्यावा.
- ✓ गावपातळीवर गावातील शेतकरी मित्र, शेतकरी गटाचे प्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायतीचे सदस्य, कृषिविषयक पुरस्कार प्राप्त शेतकरी व पीकस्पर्धा विजेते शेतकरी, प्रगतीशील शेतकरी आणि कृषि सेवा केंद्रांचा सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच ग्रामसेवक, तलाठी आणि गावपातळीवर काम करणा-या इतर सर्व विभागाच्या कर्मचा-यांचाही सहभाग घ्यावा.
- ✓ प्रत्येक गावामध्ये बैठकीसाठी शास्त्रज्ञ, प्रगतीशील शेतकरी, कृषि विभागाचे अधिकारी यापैकी किमान एक उपस्थित राहिल अशा प्रकारे नियोजन करावे.
- ✓ सप्ताहापूर्वी स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन इ. माध्यमांद्वारे सदर कार्यक्रमास विस्तृत प्रसिद्धी द्यावी.

**गावनिहाय नियोजन :-**

तालुका कृषि अधिका-यांनी गावपातळीवरील क्षेत्रिय कर्मचारी जसे, कृषि सहाय्यक, ग्रामसेवक आणि तलाठी यांची एकत्रित बैठक घेऊन सप्ताहाच्या नियोजनाबाबत विस्तृत चर्चा करावी.

**कार्यक्रमाचे सुक्ष्म नियोजन करताना पुढील बाबींचा समावेश करावा :-**

- दि.१ ते ७ जुलै २०१६ या कालावधीत गावामध्ये बैठकीचे आयोजन करावे.
- बैठकीनंतर आवश्यकतेनुसार शेतक-यांसोबत गावात कृषिविषयक राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना भेट.
- कृषि विषयक मोफत सल्ला व मार्गदर्शनाकरीता एम.किसान पोर्टलवर शेतकरी नोंदणी मोहिम.
- शेतकरी मासिकाचे वर्गणीदार वाढविण्याची मोहिम.
- विविध पीक स्पर्धा आणि पुरस्कारांबाबत प्रचार-प्रसिध्दी.
- जलयुक्त शिवार अभियान, एकात्मीक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, मागेल त्याला शेततळे याबाबतच्या यशोगाथांना प्रसिद्धी.
- कृषि पतपुरवठा व त्याचे उत्पादक बाबीसाठी विनियोगाबाबत जागृती.
- आधुनिक तंत्रज्ञानासंबंधी म्हणी व घोषवाक्ये गावागावात ठळक ठिकाणी प्रदर्शित करणे.
- कृषि व कृषि संलग्न योजनांबाबत घडीपत्रिका, हस्तपत्रिका, भित्तीपत्रिका तयार करुन वाटप करणे.
- सप्ताह कालावधीत गावामध्ये शेतक-यांना तांत्रिक मार्गदर्शनाच्या वेळी विविध सादरीकरणाच्या सि.डी.,डी.व्ही.डी., यशोगाथा पुस्तिका इ.चा वापर करावा.

- तालुक्यातील कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी तसेच नाविन्यपूर्ण, प्रयोगशील व उल्लेखनीय काम करणा-या शेतक-यांच्या सत्काराचे आणि त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करावे.
- कार्यक्रमासाठी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात बॅनर तयार करावा.

**कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना पुढील विषय/बाबींवर तांत्रिक मार्गदर्शन करावे :-**

- पीक उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्च कमी करण्याबाबत मार्गदर्शन.
- प्रधानमंत्री पीक विमा योजना, हवामान आधारीत फळ पीक विमा योजना आणि गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबत जनजागृती, प्रसिद्धी व मार्गदर्शन.
- प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेबाबत जनजागृती, प्रसिद्धी व मार्गदर्शन.
- जमीन आरोग्य पत्रिका वितरण, वाचन आणि मार्गदर्शन.
- परंपरागत कृषि विकास योजनेबाबत मार्गदर्शन.
- केंद्र व राज्य शासनाच्या कृषि व कृषि संलग्न विभागांच्या शेतक-यांसाठी असलेल्या योजनांबाबत मार्गदर्शन.
- कापसावरील शेंदरी बोंड अळी आणि सोयाबीनवरील मोझॅक व पिवळा मोझॅक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन.
- रुंद सरी वरंबा यंत्र वापराची व पेरणीची प्रात्यक्षिके .
- बिजप्रक्रिया बाबत प्रात्यक्षिके.
- कडधान्य आंतरपिकाबाबत मार्गदर्शन
- बहुपीक पद्धतीचा प्रसार (Crop Diversification).
- एकात्मिक शेती पद्धती संकल्पनेबाबत मार्गदर्शन.
- हायड्रोफोनिक्स- हिरवा चारा निर्मिती
- श्री/चारसुत्री/एस.आर.टी.पध्द्तीने भात लागवडीबाबत मार्गदर्शन.
- बी-बियाणे, खते, औषधे खरेदी व वापर करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन.
- फळबाग लागवड कार्यक्रम.
- मूलस्थानी जलसंधारणाबाबत जनजागृती व मार्गदर्शन.
- आपत्कालीन पीक नियोजनाबाबत मार्गदर्शन.

सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमाचे जिल्हा आणि तालुकास्तरावर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजन करुन सप्ताहात पार पाडलेल्या कार्याचा गावनिहाय आढावा घ्यावा. त्यामध्ये सप्ताहातील कार्यक्रमांबाबत शेतक-यांच्या प्रतिक्रिया आणि मनोगत घ्यावे. सप्ताहामध्ये झालेल्या कामास व्यापक प्रसिध्दी दयावी.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्हयातील कार्यक्रमाचे सुक्ष्म नियोजन व अंमलबजावणीकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करावी. सदर बैठकीस खालील अधिका-यांचा समावेश असावा.**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
- प्रकल्प संचालक आत्मा ,
- कृषि विद्यापीठ प्रतिनिधी,
- कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी.
- पशुसंवर्धन, दुग्धविकास, रेशिमउद्योग, मत्स्यव्यवसाय, आदिवासी विकास विभागांतील संबंधित अधिकारी
- कृषि विकास अधिकारी (जि.प.),

- उपविभागिय कृषि अधिकारी,
- तालुका कृषि अधिकारी,
- पंचायत समितीचे कृषि अधिकारी,

यांव्यतिरीक्त आवश्यकतेनुसार इतर अधिका-यांचाही समावेश करावा.

## कृषि जागृती सप्ताहाची अंमलबजावणी -

**१ जुलै रोजी स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त कृषि दिन तालुका व जिल्हास्तरावर साजरा करुन सप्ताहाचा शुभारंभ करावा.**

✓ **जिल्हास्तर :-** जिल्हयाचे मा.पालकमंत्री व जिल्हयातील केंद्र व राज्य सरकारमधील मंत्री महोदय, राज्यसभा व लोकसभा सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. व इतर पदाधिकारी यांचेशी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक, आत्मा व कृषि विकास अधिकारी (जि.प.) यांनी संपर्क साधून उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करावे.

✓ **तालुकास्तर**:- सर्व विधान परिषद व विधानसभा सदस्य, पंचायत समिती सभापती व इतर पदाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी यांचेसह तालुक्यातील इतर अधिकारी यांना निमंत्रित करावे.
हीे जबाबदारी उपविभागिय कृषि अधिकारी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्या मदतीने पार पाडतील.

✓ **ग्रामस्तर :-** उक्त गावनिहाय नियोजनाप्रमाणे सप्ताहातील कार्यक्रम चालू असताना महिला शेतक-यांचाही जास्तीत जास्त सहभाग राहील असे पाहावे. अधिकाधिक उपस्थितीकरीता कार्यक्रमाच्या दैनंदिन नियोजनाबाबत शेतक-यांना पुर्वकल्पना द्यावी.

## सनियंत्रण व पर्यवेक्षण -

विभागिय कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिका-यांमार्फत विभागातील सर्व जिल्हयातील कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे. त्यासाठी कार्यालयातील अधिका-यांकडे जिल्हानिहाय कार्यक्रमाची जबाबदारी सोपवावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक आत्मा यांनी त्यांच्या कार्यालयातील अधिका-यांमार्फत तालुकानिहाय कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे. सनियंत्रणासाठी कार्यालयातील अधिका-यांकडे तालुक्यांची विभागणी करुन द्यावी.

गावात आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा दैनंदिन अहवाल **परिशिष्ट -२अ** नुसार संबंधित कृषि सहायक/कृषि पर्यवेक्षक व शेतकरी मित्र यांनी दुस-या दिवशी सकाळी तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा. त्यानुसार तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्याचा संकलित अहवाल **परिशिष्ट - २ ब** मध्ये त्वरीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुका निहाय दैनंदिन अहवालावरुन जिल्हयाचा संकलित अहवाल **परिशिष्ट -२ क** मध्ये विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास सादर करावा.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांचा जिल्हानिहाय एकत्रित अहवाल **परिशिष्ट-२ क** मध्येच आयुक्तालयास सादर करावा, सप्ताह कालावधीत विभागातील सर्व जिल्ह्यांचा दैनंदिन

जिल्हानिहाय अहवाल आयुक्तालयास कळविणे व सादर करण्याची जबाबदारी कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी यांचेवर सोपवावी.

तसेच सप्ताहात आयोजित कार्यक्रमांचे फोटोग्राफ्स, वृत्तपत्रातील कात्रणे, व्हिडीयो क्लिप्स विभागिय कृषि सहसंचालक यांनी संकलित करुन हार्ड व सॉफ्टकॉपी मध्ये कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

कृषि आयुक्तालय स्तरावरुन कृषि जागृती सप्ताहाचे सनियंत्रण करण्यासाठी **परिशिष्ट -४** मध्ये दर्शविलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेत येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी सप्ताहामध्ये विभागातील, जिल्हयातील कार्यक्रमांना भेटी देउन अहवाल **परिशिष्ट-३** मध्ये commagricell@gmail.com, ddinfor@gmail.com या ई-मेल वर सादर करावा.

**सदर सप्ताहासाठी स्वतंत्र निधीची तरतूद नाही, तथापि आपल्याकडे आत्माअंतर्गत तसेच विविध योजना/अभियान यामधील प्रशिक्षण, संकिर्ण/आकस्मिक निधी, प्रचार व प्रसिध्दीकरीता असणारी तरतूद यामधुन विहीत मर्यादेच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा.**

सोबत - शासन निर्णय

आयुक्त, कृषि
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत-

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पणन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.कुलगुरू, सर्व कृषि विद्यापीठे
३) विभागीय आयुक्त (सर्व)
४) आयुक्त, पशुसंवर्धन
५) आयुक्त, दुग्धव्यवसाय
६) आयुक्त, सहकार
७) आयुक्त, साखर
८) आयुक्त, आदिवासी विकास
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प. (सर्व)
११) प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व)
१२) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व)
१३) कृषि विकास अधिकारी (सर्व)

**कृषि जागृती सप्ताह २०१६ करीता बॅनरचा नमुना -**

| |
|---|
| **महाराष्ट्र शासन कृषि विभाग**<br>**कृषि जागृती सप्ताह २०१६**<br>गावः..........तालुकाः.........जिल्हाः.........<br>दिनांक : |

## परिशिष्ट -१

## कृषि जागृती सप्ताहाचा तालुका निहाय नियोजनाचा आराखडा

**तालुका : ................ ,जिल्हा :..................**

| अ.क्र | दिनांक | गावाचे नाव | कार्यक्रमाचे ठिकाण | वेळ | प्रस्तावित मार्गदर्शक शास्त्रज्ञ/अधिकारी/प्रगतीशील शेतकरी | संपर्क अधिकारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नाव | पदनाम | मो.न. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

## परिशिष्ट -२ अ

## कृषि जागृती सप्ताह

## गावात आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा तपशिल

दिनांकः.............

१) गावाचे नावः..................२) तालुका : ................ ३) जिल्हा :..................

४) कृषि सहायक/पर्यवेक्षकाचे नाव व भ्रमणध्वनी क्र.

५) शेतकरी मित्र (F.F) नाव व भ्रमणध्वनी क्र.

६) कार्यक्रमाचे ठिकाण : ७) वेळ :

८)उपस्थित शेतकरी संख्या :

९)उपस्थित लोकप्रतिनिधी/पदाधिकारी यांचे नाव :

१०) उपस्थित मार्गदर्शक (शास्त्रज्ञ/अधिकारी/प्रगतीशील शेतकरी/संस्था प्रतिनिधी):

| अक्र | नाव | पदनाम | संस्था/विभाग | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कार्यक्रमाचा तपशिल :

स्वाक्षरी/-
शेतकरी मित्र

स्वाक्षरी/-
कृषि सहायक/पर्यवेक्षक

## परिशिष्ट -२ ब

## कृषि जागृती सप्ताह तालुक्याचा दैनंदिन अहवाल

**तालुका : ................ ,जिल्हा :.................. दिनांक:.............**

| अ क्र | तालुक्यातील एकुण गावे संख्या | कार्यक्रम घेतलेले गावे संख्या | उपस्थित शेतकरी संख्या | उपस्थित मार्गदर्शक संख्या | | | उपस्थित लोकप्रतिनिधी / पदाधिकारी संख्या | आयोजित कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्त्रज्ञ | अधिकारी | प्रगतीशील शेतकरी | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
तालुका कृषि अधिकारी

## परिशिष्ट -२ क

## कृषि जागृती सप्ताह जिल्ह्याचा दैनंदिन अहवाल

**जिल्हा :.................. विभाग : ................ दिनांक:.............**

| अ क्र | जिल्ह्यातील एकुण गावे संख्या | कार्यक्रम घेतलेली गावे संख्या | उपस्थित शेतकरी संख्या | उपस्थित मार्गदर्शक संख्या | | | उपस्थित लोकप्रतिनिधी / पदाधिकारी संख्या | आयोजित कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्त्रज्ञ | अधिकारी | प्रगतीशील शेतकरी | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

## परिशिष्ट -३

## कृषि जागृती सप्ताहाचा तालुका निहाय दैनंदिन अहवाल

**समन्वय अधिका-याचे नाव व पदनाम : ...............................**

| दिनांक | भेट दिलेले गाव | तालुका व जिल्हा | उपस्थित शेतकरी संख्या | कार्यक्रमाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

स्वाक्षरी /-
समन्वयक अधिकारी

## परिशिष्ट -४

### कृषि जागृती सप्ताह राज्यस्तरीय समन्वय अधिकाऱ्यांचा तपशिल

| अक्र | विभाग | जिल्हा | जिल्हास्तरीय समन्वयक | | विभागस्तरीय समन्वयक |
|---|---|---|---|---|---|
| | | | नाव | पदनाम | नाव व पदनाम |
| १ | ठाणे | ठाणे | श्री.गंगाधर मुरामाडे | कृ.उ.स.( फलो-१) | डॉ.एस.एस.अडसूळ<br>कृषि संचालक (फलोत्पादन)<br>agridhrt@gmail.com<br>9422084833 |
| २ | | रायगड | श्री.डी.बी.पाटील | कृ.उ.स.(सा.-१) | |
| ३ | | रत्नागीरी | श्री.गणेश मांढरे | कृ.उ.स.(का.शे.अ.) | |
| ४ | | सिंधुदूर्ग | श्री.फीलीप डीसोझा | कृ.उ.स.(सा.-२) | |
| ५ | | पालघर | श्री. एस.व्ही.भालेराव | सांख्यिक (कृषि गणना ) | |
| ६ | नाशिक | नाशिक | श्री. के.टी.शिंदे | कृ.उ.स.(सं.प्र.) | डॉ.एस.एल.जाधव<br>कृषि संचालक<br>(म.रा.फ.औ.म.मं.)<br>mshmpb_pune@rediffmail.co |
| ७ | | जळगाव | श्री. दिलीप झेंडे | प्रकल्प व्यवस्थापक (सा.शे.) एन.एच.एम | |
| ८ | | धुळे | श्री.पी.जे.यादव | कृ.उ.सं.(गुनि-१/२) | |
| ९ | | नंदूरबार | श्री.एन.एम.कोळपकर | प्रकल्प व्यवस्थापक (पी.एच.एम) | |
| १० | पुणे | पुणे | श्री.किशोर डेरे | मुख्य निरीक्षक ( गुनि-७/८) | श्री. कृ.वि.देशमुख,<br>कृषि संचालक(विप्र)<br>agridext.mah@nic.in<br>9404963700 |
| ११ | | अहमदनगर | श्री.आर.एम नाईकवाडी | अ.कृ.अ.दक्षता पथक | |
| १२ | | सोलापूर | श्री.डी.बी.देशमुख | कृ.उ.सं.( नि.व अ.) | |
| १३ | कोल्हापुर | कोल्हापूर | डॉ.राम लोकरे | कृ.उ.स.(विप्र-२) | श्री.एस.बी.खेमनार,<br>कृषि सहसंचालक(विप्र-१)<br>jda.extn1@gmail.com<br>9822006231 |
| १४ | | सातारा | श्री. रविंद्र भोसले | प्रकल्प व्यवस्थापक (नि.शे.)एन.एच.एम | |
| १५ | | सांगली | श्री.शशीकांत जाधव | कृ.उ.स.(गुनि-५) | |
| १६ | औरंगा बाद | औरंगाबाद | श्री.शिवराज घोरपडे | भो.मा.त.,वसुंधरा पाणलोट | श्री.एम.एस.घोलप<br>कृषि सहसंचालक (विप्र-३)<br>msgholap60@gmail.com,<br>9422014935 |
| १७ | | बीड | श्री.हिरालाल म्हस्के | कृ.उ.सं.(मृद् २) | |
| १८ | | जालना | श्री.जालींदर पांगारे | कृ.उ.सं.( फलो. ४ सुक्ष्मसिंचन) | |
| १९ | लातुर | लातूर | श्री.ज्ञानेदव वाकुरे | उपायुक्त (कृ.ग) | श्री.ज्ञानेदव वाकुरे<br>कृषि सहसंचालक (विप्र-२)<br>dnyan.wakure@gmail.com<br>9404953281 |
| २० | | उस्मानाबाद | डॉ.जे.आर.टेकाळे | कृ.उ.सं.( गुनि-६) | |
| २१ | | परभणी | श्री.एम.एस.त्र्यंबके | कृ.उ.सं.( फलो.-२) | |
| २२ | | हिंगोली | श्री.महेश झेंडे | कृ.उ.सं.( मृद-१) | |
| २३ | | नांदेड | श्री.चंद्रकांत गोरड | कृ.उ.स.( मृ.स.मु.चा.) | |
| २४ | अमरावती | अमरावती | श्री.राजेंद्र कवडे | कृ.उ.स.( गुनि-३/४) | श्री. ज्ञानेश्वर बोटे<br>कृषि सहसंचालक (मृस)<br>jdasoil@rediffmail.com<br>9422384384 |
| २५ | | बुलढाणा | श्री. उदय देशमुख | मुख्य सांख्यिक | |
| २६ | | अकोला | श्री.विकास पाटील | मु.गु.नि.अ. | |
| २७ | | यवतमाळ | श्री.रमेश धुमाळ | कृ.उ.सं.( मृद-४) | |
| २८ | | वाशिम | श्री.विजयकुमार राऊत | कृ.उ.स.( फलो.-३) | |
| २९ | नागपूर | नागपूर | श्री.प्रकाश सोनवणे | कृ.उ.स.( मृद-७) | श्री. पी.एन.पोकळे<br>कृषि संचालक (कृ.प्र. व नियो.)<br>dagriprocess@rediff.com<br>9423136559 |
| ३० | | वर्धा | श्री.रविंद्र ढमाळ | कृ.उ.सं.( विप्र-३) | |
| ३१ | | भंडारा | श्री.बाळासाहेब धुमाळ | कृ.उ.सं.( द.प.) | |
| ३२ | | गोंदिया | श्री.अर्जुन फुले | कृ.उ.स.( एन.एच.एम.) | |
| ३३ | | चंद्रपूर | श्री.एस.एम.घाडगे | कृ.उ.स.( विप्र-७) | |
| ३४ | | गडचिरोली | श्री.विजय कोळेकर | कृ.उ.सं.( विप्र-१) | |

आयुक्त, कृषि
महाराष्ट्र राज्य, पुणे

दिनांक १ ते ७ जुलै, २०१६ या कालावधीत राज्यात “ कृषि जागृती सप्ताह ” आयोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. कृषिदि २०१६ /प्र.क्र.३६(२)/३ अे
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- १७ जून, २०१६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याच्या कृषि विकास दरात वृध्दी करणेचे दृष्टीने केंद्र आणि राज्य पुरस्कृत विविध योजना अभियान स्वरुपात राबविणेत येत आहेत. कृषि विद्यापीठाकडील सुधारित तंत्रज्ञान आणि संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्यांच्या उत्पन्नात वाढ होणेकरिता सातत्यपूर्ण प्रयत्न सुरु आहेत. कृषि विस्तारास गती देण्याकरीता कृषि विभागाकडून माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिकाधिक शेतकऱ्यांना कृषि विभागाशी जोडले जात आहे. या सर्व प्रयत्नांना पुरक म्हणून संपुर्ण राज्यात दिनांक १ ते ७ जुलै २०१६ या कालावधीत “ कृषि जागृती सप्ताह ” साजरा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

दिनांक १ ते ७ जुलै, २०१६ या कालावधीत यावर्षी राज्यात “ कृषि जागृती सप्ताह ” साजरा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर सप्ताहामध्ये कृषि विषयक केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध कृषि योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात यावी. तसेच राज्यातील कृषि विद्यापीठे, केंद्रीय संशोधन संस्था यांनी संशोधीत केलेले अद्ययावत कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे. सदरचा कार्यक्रम प्रत्येक गावामध्ये राबविणेकरीता तालुका व जिल्हास्तरावर सुक्ष्म नियोजन करण्यात यावे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सर्व संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करावी. या नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये कृषि विद्यापीठे आणि त्याअंतर्गत येणारी संशोधन केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे, सर्व कृषि महाविद्यालये, सर्व कृषि तंत्रनिकेतन, साखर कारखाने, कृषि उत्पन्न बाजार समित्या, महाबीज, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँका तसेच सर्व कृषि संलग्न विभाग यांचा सक्रिय सहभाग घेण्यात यावा. गावपातळीवर गावातील शेतकरी मित्र, शेतकरी गटांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांचा सहभाग घ्यावा. गावातील सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना कार्यक्रमामध्ये सहभागी करुन घ्यावे.

२. सदरहू कृषि सप्ताह सप्ताह साजरा करणेबाबत आयुक्त ( कृषि ), कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कृषि व संलग्न विभागांकरिता सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित कराव्यात.

३. सदर सप्ताहासाठी स्वतंत्र निधीची तरतुद करण्यात येणार नसल्याने विविध मंजुर योजनांमधील प्रशिक्षण संकीर्ण बाबीकरीता असलेला निधी आणि आत्मा अंतर्गत उपलब्ध निधीमधून विहीत मर्यादेच्या अधीन राहून खर्च करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६१८१५२३४८०३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**( विक्रम ढमाळ )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. आयुक्त ( कृषि ), कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. मा.कुलगुरु, सर्व कृषि विद्यापीठे
४. मा.कुलगुरु, माप्सू, नागपूर.
५. अमुस (कृषि), कृषि व पदुम, मंत्रालय मुंबई ३२
६. अमुस (वस्त्रोद्योग ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग, मुंबई
७. प्रधान सचिव (ग्राम विकास),मंत्रालय,मुंबई
८. प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग),मंत्रालय,मुंबई
९. सचिव (जलसंधारण),ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. सचिव (सामाजिक वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. आयुक्त,कृषि,महाराष्ट्र राज्य,पुणे (५ जादा प्रतीसह)
१३. आयुक्त,सहकार,महाराष्ट्र राज्य,पुणे
१४. आयुक्त साखर,महाराष्ट्र राज्य,पुणे
१५. आयुक्त,पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य,पुणे
१६. आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,पुणे
१७. आयुक्त,दुग्धव्यवसाय,वरळी,मुंबई,महाराष्ट राज्य
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रसिध्दीच्या विनंतीसह ( ५ प्रती )
१९. महासंचालक, वनामती, वसंतराव नाईक, राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर
२०. आयुक्त (आदिवासी विभाग), नाशिक
२१. महासंचालक कृषि संशोधन विकास परिषद, पुणे.
२२. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक वखार महामंडळ, पुणे.

२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, गोरेगांव मुंबई
२४. व्यवस्थापकीय संचालक महाबीज अकोला
२५. व्यवस्थापकीय संचालक पणन मंडळ, पुणे.
२६. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२७. संचालक, राष्ट्रीय कृषि संशोधक केंद्र द्राक्ष, माजरी, डाळिंब-सोलापूर, कांदा व लसूण, राजगुरु नगर, पुणे, लिंबू वर्गीय, नागपूर
२८. सर्व संचालक,(कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे.
२९. सर्व सह संचालक,(कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे
३०. सर्व प्राचार्य कृषि महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३१. सर्व अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य
३२. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य
३३. सर्व प्रकल्प समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रे, महाराष्ट्र राज्य.
३४. व्यवस्थापकीय संचालक, सर्व साखर कारखाने, महाराष्ट्र राज्य
३५. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समित्या, महाराष्ट्र राज्य
३६. जिल्हा अग्रणी बॅक अधिकारी, महाराष्ट्र राज्य
३७. सर्व जिल्हा विकास अधिकारी, नाबार्ड, महाराष्ट्र राज्य
३८. कृषि व पदुम विभाग/ कार्यासन ३ निवड नस्ती.